## मना

एक मन वेडे माझे
एक शहाणे सुरते
कुणा कसे, सांगू कशी?
मला ना ते कळते |
वेड्या मना कळते सारे
एक नजर पुरते
सारे काही जाणूनही
शहाणे पुरते फसते |
सांग सांग म्हणूनही
मौन वेडे घेते
शहाणे मात्र मुक्यानेच
सारे सांगून बसते |
वेड्या मना, नको पुन्हा
कशासाठी झुरते?
शहाण्याने सांगूनही
काहीतरी उरते ||
लपून छपून वेडे मन
आत डोकावते
शहाणे मात्र राजरोस
पुढे पुढे करते ||
वेडे मन शांतपणे
पुन्हा कवे घेते
शहाणे मात्र रागावून
दूर ढकलते ||
मनाचिये गुंती आता
किती अडकते?
नको सुटू नाहीतर आता
माझी मी न उरते ||

**------संध्या रानडे**